# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिर सुचना

विषयः- अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहिर सुचना.

सदर सुचनेद्वारे नोंदणीकृत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, विभागातील अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करणेकामी खालील अटीनुसार कंत्राटी कामगार पुरविण्याबाबत इच्छुक अशासकीय संस्थांनी (एन.जी.ओ.) सहाय्यक आयुक्त, आर-उत्तर विभाग कार्यालय इमारत, संगीतकार सुधीर फड़के उड्डानपुलाखाली, जयवंत सावंत मार्ग, दहिसर (प), मुंबई – 400 068 यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या संस्थांनी खालील नमूद आवश्यक कागदपत्रांसहित दि. 18.03.2020 रोजी दुपारी 01.०० वाजेपर्यंत सिलबंद अर्ज अनुज्ञापन खाते, आर-उत्तर विभाग येथे सिलबंद पेटीत टाकावे.

अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) संस्थांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

1. सदर कामांसाठी फक्त स्थानिक आर-उत्तर विभागातील अशासकीय संस्थांनी अर्ज करावेत.
2. 6 महिन्यांच्या कालावधीकरिता आवश्यकतेनुसार कामगार पुरविणे. (मंजुरी मिळाल्यापासुन)
3. प्रतीदिन प्रती कामगार रू. 625.38/- इतके वेतन+46% लेव्हीचे अधिदान परिपत्रक क्र. प्रकाअ/ 4/2018-19 दिनांक 31.08.2018 च्या अटीच्या पूर्ततेनंतर (प्रतीपूर्ती स्वरूपात) करण्यात येईल.
4. आर-**उत्तर** विभागातील अधिका-यांच्या सुचनेनुसार रोजच्या कामाकरिता मागणी केल्याप्रमाणे (सकाळ/दुपार/रात्र) सुरळीतपणे विनाविलंब, सक्षम कामगा-यांचा पुरवठा करणे. सदर अटीचा भंग झाल्यास प्रपत्र ब प्रमाणे दंड आकारण्यात येईल.
5. पुरवठा केलेल्या कामगारांचा देयकाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परिरक्षणानंतर विभागीय लेखा सांकेतांक 220800400 या लेखाशिर्षातून संबंधित संस्थेला ई.सी.एस./एन.ई.एफ.टी. द्वारे अधिदान केले जाईल.
6. संस्थेने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या कामगारांना प्रत्येकी महिन्याच्या 10 तारखेच्या आत दरमहा वेतनाचे अधिदान आरटीजीएस/एनईएफटी द्वारे करणे बंधनकारक राहिल. तसे न केल्यास संस्थेचे काम रद्द करून संस्था काळया यादीत टाकण्यात येईल. महानगरपालिकेकडून आरटीजीएस/एनईएफटी द्वारे अधिदान मिळाले नसले तरीही कामगारांना विहित अधिदान करणे बंधनकारक आहे. अन्यथा प्रपत्र ब प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल.

7. बाल कामगारांचा पुरवठा करणे निषिध्द आहे व तसे केल्यास त्याची संपुर्णतः कायदेशीर जबाबदारी संबंधित अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचीच राहिल.

8. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांनी नोंदणी प्रमाणपत्र, बॅंक खात्याचा तपशिल, मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

9. उपरोक्त अटींचे पालन न करणा-या व समाधानकारकरित्या काम न करणा-या अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचे कडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरीत थांबविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त आर-उत्तर विभाग यांना राहतील.

10. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचे कडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून लॉटरी पध्दतीने पात्र अशासकीय संस्थेची निवड करण्यात येईल. उपरोक्त निकषामध्ये न बसणा-या संस्थाना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. लॉटरीची तारीख दि. 21.03.2020 रोजी दुपारी 11.०० वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

**सहाय्यक आयुक्त आर-उत्तर विभाग**